# मन मोहरून माझे

(मनावरील कवितासंग्रह - भाग ४)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**मन मोहरून माझे** (मनावरील कवितासंग्रह - भाग ४)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : drmangushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : मार्गशीर्ष शु. ३, शके १९४७
रविवार, दि. २३ नोव्हेंबर, २०२५

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-995633-5-3

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹ १५०/-**

सर्व रसिकवरांना
सादर समर्पण...

# मनोगत

## ‘मन मोहरून माझे’ माझ्या अंतर्मनाचा प्रवास

कविता लिहिणे हे माझ्यासाठी कधीच ठरवून केलेले काम नव्हते. कविता माझ्याकडे स्वतः येत गेल्या. कधी पावसाच्या आवाजात, कधी उघड्या खिडकीतून येणाऱ्या संध्याकाळी, कधी मनात नकळत जागलेल्या एखाद्या आठवणीच्या अस्फुट धूसरात. ‘मन मोहरून माझे‘ हा संग्रह म्हणजे त्या सर्व क्षणांचे एकत्रित दालन आहे. जिथे मी, माझे शब्द, माझे अनुभव आणि माझे भावविश्व एकत्र शांत बसले आहे.

शब्दांची सुरुवात नेहमी मनातून होते. कधी काही बोलता येत नाही असं वाटतं, पण मनातल्या भावना कागदावर सहज उतरतात. अशा वेळी कळतं की कविता ही माणसाच्या अंतर्मनातील एक नैसर्गिक भाषा आहे. जिला शिकावं लागत नाही; ती अनुभवावी लागते. या संग्रहातील प्रत्येक कविता ही माझ्या आयुष्यातील एखादा क्षण, एखादी वाट, एखादी सापडलेली जाणीव आहे.

प्रेमाविषयी लिहिणं खूप नाजूक काम असतं. कारण प्रेम शब्दांत कैद होत नाही; ते जाणवण्यात असतं. माझ्या कवितांमध्ये प्रेम हे मोठ्या घोषणांमध्ये नाही; ते साध्या स्पर्शात, एखाद्या हलक्या नजरेत, वाऱ्यातील गंधात गुंतलेलं आहे. काही कविता लिहीताना मन एवढं शांत होतं की त्या ओळींचा जन्म बहुतेक म्हणूनच इतका सहज, इतका स्पंदनशील झाला असावा.

विरहाच्या कविताही आहेत. पण तो आक्रोश नाही; तो एका वस्तुनिष्ठ स्वीकाराचा, मनाला उभारी देणाऱ्या निष्ठूर पण सुंदर शिकवणीचा प्रवास आहे. जीवनाच्या उतार-चढावांनी शिकवलेली परिपक्वता कधीकधी शब्दांत उमटते आणि तिचं रूप विरह कविता घेतात. त्या लिहिताना माझं मन कधी तुटलं नाही, पण ते अधिक मजबूत होत गेलं.

निसर्ग माझा जुना सोबती आहे. वाटेत एखादं कोमेजलेलं पान दिसलं तरी त्यातून एक कविता उमलते. सकाळची पहिली रेघ, रात्रीचं चांदणे, पाऊस, पाण्याचा आवाज या गोष्टी मला नेहमी बोलत राहतात. मला जे शब्द सापडले, ते या संग्रहात जसेच्या तसे वाचकांपर्यंत पोहोचले आहेत.

हा संग्रह पूर्ण करताना एक मोठी जाणीव झाली. कविता लिहिणे म्हणजे स्वतःला वारंवार नव्यानं ओळखणे. प्रत्येक रचनामागे माझ्या मनाचा एक कोवळा कोपरा उघडलेला आहे. आणि त्याच उघड्या कोपऱ्यातून माझं मन जणू म्हणतं 'जगाने अनुभवलेल्या सुंदर क्षणांना शब्दांचं पंख द्या.'

'मन मोहरून माझे' प्रकाशित होत असताना मला हक्काने सांगावसं वाटतं हा संग्रह माझा नाही, तो माझ्या मनाचा प्रवास आहे. वाचकांच्या मनात या प्रवासातील एक ओळ, एक क्षण, एक ठावरी लागली, तर या लेखनाचा अर्थ पूर्ण होईल.

**– डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

## ‘मन मोहरून माझे’ एक अंतःप्रवासाची उजळ दारं

कवितेचा जन्म हा नेहमी शब्दांत होत नाही; तो आधी होत असतो एका जाणिवेत, एका स्पंदनात, ज्या क्षणी मन बाहेरच्या जगाकडे पाहणं थांबवून अंतर्मनाची खिडकी उघडतं. त्या खिडकीतून जे प्रकाशकण येतात, जे वारे झुलतात, जे स्मृतींचे सुगंध काळजाला भिजवतात, तेच पुढे कवितेच्या स्वरूपात जगासमोर येतात. ‘मन मोहरून माझे’ हा असा एक अंतःप्रवास आहे. जिथे भावनांना रंग आहे, शब्दांना स्पर्श आहे आणि नजरेला अर्थ आहे.

आजच्या धावत्या, उथळ होत चाललेल्या काळात कविता ही केवळ वाचण्याची गोष्ट उरलेली नाही; ती थांबण्याची गोष्ट झाली आहे. या काव्यसंग्रहातील प्रत्येक कविता ही वाचकाला थोडा विराम देते. जणू कोणी शांतपणे हात धरून म्हणतं, ‘ये दोन क्षण स्वतःपाशी बस.’ कवयित्री डॉ. मंजूषा कुलकर्णी यांची खासियत हीच शब्दांना संवेदनशीलतेचे कोंदण देणे आणि भावनांना साधेपणाची सोनछडी लावणे.

कधी हे शब्द वा. पु. काळे यांच्या ललित लेखनातील निरागसतेसारखे हलकेच खांद्यावर येऊन बसतात, तर कधी विंदा करंदीकर यांच्यासारखे स्वच्छ, निर्मळ, मनाच्या पांढऱ्या पानावर आपली छाप उमटवतात. कधी पु. ल. देशपांडे यांच्या सहज विनोदाची, माणसांच्या मनात शिरण्याच्या कलेची झलक दिसते, तर कधी निसर्गाशी संवाद साधताना नासिर फडक्यांच्या ओळींचा सुगंध.

या कवितांतील भावविश्व तीन तत्त्वांभोवती फिरताना दिसतं. प्रेम, विरह आणि उगवती शांतता. प्रेम इथे गोंगाट नाही; ते मृदु आहे, सावलीसारखं आहे, पाण्याच्या काठावरच्या वाऱ्यासारखं आहे. विरह इथे वेदना नाही; तो परिपक्वतेचा पहिला धडा आहे आणि शांतता इथे रिकामी नाही; ती अर्थपूर्ण आहे. गूढ, खोल, आणि मनाला नव्या वाटेवर नेणारी. या संग्रहातील भाषा ही नुसती भावनांची माळ नाही; ती एक अनुभवाची तान आहे. कधी उडत्या पाखरांसारखी; कधी

थबकलेल्या दिव्यांसारखी; कधी अंगाईसारखी; कधी अंतर्मनाच्या भुयारातून आलेल्या प्रार्थनेसारखी. शब्दांचे अलंकार येथे आवश्यक तेवढेच, पण प्रभाव मात्र प्रखर जणू सूर्योदयाची पहिली किरणरेषा.

या कवितांमध्ये एक वैशिष्ट्य विलक्षण उठून दिसते. कवयित्रीचे निसर्गाशी असलेले अदृश्य नाते. पाणी, वारा, पानं, फुले, चांदणे, पाऊस. ही सगळी प्रतीकं शब्दांत मिसळून कवयित्रीच्या भावविश्वाला वेगळे रूप देतात. एखाद्या ओळीतून पाऊस गातो, तर दुसऱ्या ओळीतून वारा कुजबुजतो. हे जगणेच कवितेत मिश्रित झालेले आहे. अशी कविता वाचताना लक्षात येतं. ही केवळ लेखनाची कला नाही, तर जगण्याची शैली आहे. मन मोहरून टाकणाऱ्या प्रत्येक क्षणाची, प्रत्येक अनुभवाची, प्रत्येक नजरेची आणि प्रत्येक स्पर्शाची जागृती यात आहे. या संग्रहाचा आस्वाद वाचक घेत जातील, तेव्हा त्यांना केवळ कविता मिळणार नाही; त्यांना आपल्याच मनाशी एक खोल संवाद मिळणार आहे. म्हणूनच, 'मन मोहरून माझे' हा संग्रह रसिक मनाशी जोडला जाईल.

**श्री. उदय आठवले**
भाजपा
ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर

# अनुक्रमणिका


१) मनात माझ्या स्वप्नपालखी ... ११
२) बेभान नको होऊस तू फार ... १२
३) प्रेम उतरले हवे हवे ... १३
४) ही बाग जांभळी जी ... १४
५) शून्य केवळ राहणे ... १५
६) सांगणे सोपे खरे पण ... १६
७) ऋणानुबंधांचे बंध अगणित ... १७
८) उत्सव रम्य पहावा ... १८
९) जग नवे उजवायचे ... १९
१०) पारदर्शीपण कसे लाभायचे ... २०
११) कुणी कुणाचा आरसा ... २१
१२) तव आठवांच्या फुलांना ... २२
१३) इथे फिरस्ती कितीतरी ... २३
१४) मनातल्या श्रावणाला ... २४
१५) ऐसी जगी भ्रमंती ... २५
१६) स्वच्छंदसे तराणे ... २६
१७) नाहलेली जलपरी ... २७
१८) श्रीहरी रे श्रीहरी ... २८
१९) नाथा पंढरीनाथा ... २९
२०) आषाढातील पाऊसधारा ... ३०
२१) माझा चांदवा तू सदा ... ३१
२२) जगणं म्हणजे काय? ... ३२
२३) तू अशी सुंदरी मनु मंजिरी ... ३३
२४) अधीर मन ... ३४
२५) बांके बिहारी ... ३५
२६) सुरम्य जगणे दिसावे ... ३६
२७) पुन्हा एकमेकांस पहावे नव्याने ... ३७
२८) आनंद गंध पाणी ... ३८
२९) किरमिजी किरमिजी प्रकाशवाटा ... ३९
३०) तू वसंत जीवनी असूनही ... ४०
३१) नवीन वाटे चंद्रमा ... ४१
३२) माझ्या मनमंदिराचे धाम ... ४२
३३) जिव्हाळा लळा ... ४३
३४) जपणूक ... ४४
३५) धरतीचे ओलेपण ... ४५
३६) डोळा पाऊस मावेना ... ४६
३७) सर वरचढ पडे ... ४७
३८) इंद्रधनूच्या रंगांमधुनी ... ४८
३९) आठवणीतला रम्य सुकाळ ... ४९
४०) गंध अलौकिक पारिजातकी ... ५०
४१) श्रीमुख सावळे सुंदर कृष्णा ... ५२
४२) ती पूर्णाकृती होईल ना ... ५३
४३) तुला वाहते कुसुमी वेणी ... ५४
४४) विरंगुळा ... ५५
४५) वेचूया सोने आनंदाचे ... ५६
४६) चांद उतू किती गेला ... ५७

४७) जीव ज्योतीने
उजळत जावे ... ५८
४८) सरी प्रीतीच्या साजना ... ५९
४९) हिमाचली सार्थकत्व ... ६०
५०) तू आला की
माझी दिवाळी ... ६१
५१) एक दिवाळी मनात चाले... ६२
५२) जळते अजूनी पणती ... ६३
५३) चला सावरू दिवाळी ... ६४
५४) तू दिलेले क्षण हे जीवन ... ६५
५५) कष्टभंजक हनुमते ... ६६
५६) झणी पुन्हा गेलास की ... ६७
५७) धमण्यांमधले रक्त सांगते ... ६८
५८) तुझ्याचसाठी
भावफुलांचा ... ६९
५९) धुक्यातल्या धुंदीमध्ये ... ७०
६०) शब्द आले शब्द गेले ... ७१
६१) तूचि मानसीची मनु ... ७२
६२) देत जाताना आलोक ... ७२
६३) अवचित की भेटला ... ७४
६४) ह्रदयाच्या
पानावर पाखरू ... ७५



## (१)
## मनात माझ्या स्वप्नपालखी

हवा गारवी शिरशिर शिरवी
ओल्या धुक्याची ओल नवी
इथे एकटी गीत तुझे मी
ऐकताच उमले पालवी

सूर तुझे उमटून खोलवर
झाकझाकले नयन कधी
गीत गोडवा ओठी अडला
झरते अमृतमयी नदी

प्रीत वाढते गोडी चढते
आयुष्याची साथ अशी
धुंद धुंदते सखी प्रिया तव
विसरून जाते स्वत्व कशी

अशी सांज मग मनात येते
जरा टेकण्या निवांतता
अलगुज देते सांगून वेडी
मंद रातराणी शांतता

ये ये राजा क्षणात येथे
तुझी रागिणी वाट बघे
मनात माझ्या स्वप्नपालखी
सजुनी धजुनी रोज निघे

दि.२५/०५/२०२५
रात्री ०९.४४ वा.



## (२)
## बेभान नको होऊस तू फार

किती कोसळशील धोधो करुनी
उसंत नको का तुला कधी
बोल पावसा टप टप वेड्या
झाले काय तुज सांग आधी

घेऊन येशी धारधारुल्या
अवनीवरती शिंपडण्या
जोर जरासा कमी असे तर
मिळेल फुरसत दव घडण्या

स्वच्छ न्हाऊनी धरा शोभली
तुझ्याच जलबिंदूंची कथा
अत्तर वाटे मृण्मयी धरणी
प्रीत दरवळे तिची तथा

तू येशी अन हिरवाईचे
कोंब उगवती नवे जरा
मनात टवटव आशा हिरव्या
ऋतू वर्षावाचाच खरा

प्रेम तुझे हे झेलून घेईल
वसुंधरा ही नाजुक नार
सहजी सुंदर तुला पेलण्या
बेभान नको होऊस तू फार

दि.२६/०५/२०२५
सकाळी ०६.५४ वा.



## (३)
## प्रेम उतरले हवे हवे

मनास माझ्या नव्या नव्याने
नवीच वाटे उगाच साद
कुणी कोणत्या दिशेने देते
असे वाटते हळवी साद

उगाच येती सुगंध कोठून
वाऱ्यावरती सागर लाट
मनात उठती तरंग शीतल
आनंदाचे वाहून पाट

फुले उमलती रंगही खुलती
फुलपाखरू होते मन
पाऊस पडता मातीमधले
गंधित माझे मन कण कण

आता कुणाच्या हाका ऐकून
असे वाटते गाव मिळे
कुणी सोबती असले तर मग
जगण्यासाठी नाव मिळे

असेच पहावे शून्यामधुनी
चितारलेले चित्र नवे
असेच वाटे नजरेमध्ये
प्रेम उतरले हवे हवे

दि.२८/०५/२०२५
रात्री ११.५८ वा.



## (४)
## ही बाग जांभळी जी

ही बाग जांभळी जी
गेली मनात राहून
फुलले नवेच जगणे
तिजला मी फुलता पाहून

वेड्या खुळ्या उन्हांना
आता तो जोर नाही
मिळते अशी दिशा की
तापास वाव नाही

हे मार्ग पाकळ्यांनी
गेले बुडून सारे
रंगात रंगलेले
आता उनाड वारे

आकाश दूर तेथे
सोडून निज निळाई
झाले खुलून आले
लेऊन जांभळाई

रंगास रंग आम्ही
दिधले जे व्यर्थ काही
खाणाखुणा प्रतिमा
अन त्यास अर्थ नाही

दि.०१/०६/२०२५
रात्री १२.५४ वा.

## (५)
## शून्य केवळ राहणे

तू तोच ना मज सांग की
मी तीच ना वाटे मला
वाहिले कैसे कुठे तुज
मन सुमन काटे मला

मी देत गेले जे हवे ते
रोचणारे नित तुला
विरला हवेत का प्रिया
तू बांधलेला रे झुला

सारे खोटे वागणे जे
मजसी ना कळले कधी
जे घडावे वाटते
नियतीस ना टळले कधी

वाटले होते जीवाला
लाभलेला की दिलासा
कोणत्या जन्मातला रे
तू असा धोका दिला का

शून्य उरले भोवताली
शून्य माझे पाहणे
शून्य हाती शून्य रेखा
शून्य केवळ राहणे

दि.०३/०६/२०२५
रात्री ११.५५ वा.

## (६)
## सांगणे सोपे खरे पण

सांगणे कोणास व्यर्थ
बोलणे बोलायचे
एकट्याचा जन्म इथला
एकटे सोसायचे

ज्या कळा उठल्या उरातून
त्या कुणा कळणार का
जीवनाचा संगी साथी
तो खरा मिळणार का

सोबतीने विश्व चाले
पोकळी तरीही पहा
या पसाऱ्यातून वेड्या
माणसा विलगी रहा

जे हवे वाटे जीवाला
सांगणे ते ईश्वरा
संचितांचे भोगणे मग
मागणे का परमेश्वरा

सांगणे सोपे खरे पण
वागणे खडतर किती
एक वाटे रोज आतून
मन मनी कसली भीती

दि.०५/०६/२०२५
सकाळी ०९.३६ वा.



## (७)
## ऋणानुबंधांचे बंध अगणित

ऋतू अंगावर बहारलेले
नभ मेघांनी भरून गेले
धरणीवरती आकाशाचे
नाते आगळे उरून गेले


फुलती पाने फुले डोलती
कोंब कुशीतून हळू बोलती
आज इथे हे भविष्य उमलून
आनंदाला क्षण हे तोलती

हिरवी हिरवी तृणे खेळकर
स्पर्श रेशमी रुळे अंगावर
कळ्या लाडूल्या गोड गोजिऱ्या
किती भाळावे मधु रंगावर

कोण कुणाची वाट पाहते
कोण इथे मग रमून राहते
कुणास लगे ओढ अनोखी
कोण कुणावर जीव वाहते

कसे हे जुळते नाते अनामिक
ऋणानुबंधांचे बंध अगणित
मनास सांगा कसे बांधावे
जगा भरभरून जीवन क्षणिक

दि.०६/०६/२०२५
रात्री ११.३८ वा.



## (८)
## उत्सव रम्य पहावा

रोज उमलत्या किती कळ्यांचा
हिशोब कुणी ठेवावा
रानोमाळी रोज दिवाळी
उत्सव रम्य पहावा

रंग वेगळे छंद आगळे
फुलणे अपरंपार
आकारांची किती ऐश्वर्ये
एक मनी झंकार

पानापानातून रम्यसा
एक आवाज येतो
कोंब कळीचा सौंदर्याने
ओसंडून हा जातो

मुळे सांगती खोडांना की
फांद्या डवरून याव्या
झाडावरुनी दूर दिशांना
गंधराण्या धाडाव्या

दि.०८/०६/२०२५
रात्री ११.४२ वा.




## (९)
## जग नवे उजवायचे

भावनेच्या स्पंदनांना
अंगणांचे बांध का
एक धागा सारखा जो
विश्वहृदयी सांध ना

हासणे जे मोद होता
दुःख वेळी अश्रू ते
वेदनेच्या गावी आणिक
नित दिलासे पसरू दे

रंग डोळ्यांचे विभिन्न
दृष्टी सारी एक ना
वर्ण सारे वेगळाले
सृष्टी ही अनेक ना

शब्द भाषा भिन्न तरीही
भाव येती वाचता
आत वाटे मोर खुलला
मेघ होऊन नाचता

सूर्य चंद्र तारकांचे
घर नवे उगवायचे
काळजाच्या कोशी आता
जग नवे उजवायचे

दि.१२/०६/२०२५
सकाळी ११.११ वा.



## (१०)
## पारदर्शीपण कसे लाभायचे

पारदर्शक मन माझे वाचून घे
आतले जे जग माझे समजून घे
काय लिहिले आहे मी तेथे पहा
ते तुझ्यासाठीच रे उमजून घे

शांत थोडा डोकवून पाहशील ना
तू तिथे माझ्या मनी राहशील ना
मी तुझ्या प्रेमात दिधले सर्वस्व रे
तू तुझे काळीज मजसी वाहशील ना

भावनांची ती सरिता आत वाहे
ओतप्रोत प्रीतलाट खळखळाळे
स्वार तू होऊन त्यावर पाह ना
तेज एक प्रेमरूपी बघ झळाळे

वाट मी पाहे किती तुजला कळे मग
तू किती माझाच आहेस तुज वळे मग
जाऊनी विरल्या नको त्या कल्पना
स्पष्ट आणि स्वच्छ चित्र आकळे मग

पारदर्शीपण कसे लाभायचे
या जगी तू सांग कसे वागायचे
मी अशी आहे तू घे समजून की
पारदर्शी होत तू जागायचे

दि.१४/०६/२०२५
रात्री ११.३२ वा.

## (११)
## कुणी कुणाचा आरसा

जीव कुठे अडकतो
कुठे मिडकतो कसा
नाही कुणाला कळत
कुणी कुणाचा आरसा

त्यात डोकावत जावं
असं आपलंसं कोणी
कुणी हळूच पहावं
नजरेला चुकवोनी

आत भावनांचा मेळा
डोळ्यातून डोकवावा
मुखी कुणाच्या तरी तो
प्रतिबिंबात पहावा

त्याने खरेच सांगावे
दरपण हो अर्पण
तेज चमकून जावे
होतहोता समर्पण

कधी आरश्याचा मग
व्हावे आपण आरसा
मन ठेवता नितळ
नसे फरक फारसा

दि.२१/०६/२०२५
रात्री ०९.४३ वा.



## (१२)
## तव आठवांच्या फुलांना

तव आठवांच्या फुलांना
कुठे मी सांग दडवून ठेऊ
ती कधी न कोमेजणारी
सुमने कशी लपवून नेऊ

ती आत राहती तरीही
मजला का बेधुंद करती
मी तुझ्यात हरवून बसते
त्या कळ्यांस येते भरती

ते गंध कुठे ना मिळती
ते केवळ स्वर्गसुखाचे
कस्तुरीमृगाची हरिणी
मी रान हिंडे फुकाचे

मी जगते सोबत यांची
सोबतीस तू असतो ना
स्मृती ताज्या होऊन जाता
तू जवळी मज असतो ना

मी म्हणून माळते हृदयी
या आठवणींची माळ
तुज कल्पनाही बघ नाही
मज जीवनाची सकाळ
तू, मज जीवनाची सकाळ

दि.२३/०६/२०२५
रतेय १०.४८ वा.



## (१३)
## इथे फिरस्ती कितीतरी

भूल पडते मनास माझ्या
कुठे कोणत्या जगात मी
मार्ग चालते नवे नव्याने
आणि माझ्या संगतीस मी

नव्याच इथल्या रोज सकाळी
नव्या उषेच्या नव्या खुणा
नव्या जगातील नवीच स्वप्ने
नव्या निशेला पडती पुन्हा

निशा कोणत्या जरा उशिरा
क्षितिजावरती पेंगुळल्या
प्रभातवेळी खुणा निशेच्या
उषेसाठी का रेंगुळल्या

थंडी इथली बंड पुकारे
उन्हात उडती मोद फवारे
कुठे उन्हाच्या झळा बोचती
कुठे उन्हाचे उष्ण तुषारे

मस्त धुंदीतुन रस्ते इथले
तारुण्याच्या मदात बुडती
काळ्या गोऱ्या आणि सावळ्या
सौंदर्याच्या पतंगी उडती

स्वतःत रमल्या जगात फिरती
इथे फिरस्ती कितीतरी
पुन्हा नव्याने जुन्या जगातच
जाण्यासाठी कधीतरी

दि.२४/०६/२०२५
रात्री ०८.३९ वा.



## (१४)
## मनातल्या श्रावणाला

मनातल्या श्रावणाला
श्रावणाची आस का
बरसू दे कधीही तो
साजनाचा भास का

येते आभाळ भरून
माझ्या मनाच्या गगनी
शहारली होते राजा
तुझ्या स्मृतीने साजणी

मग दव होत येती
क्षण सुंदरांची माळ
तुझा माझा होतो कैद
मनी सुखाचा तो काळ

इंद्रधनू उमटते
सप्तरंगात प्रीतीच्या
सीमा ओलांडल्या तू मी
जगरहाट रीतीच्या

ऊन पावसाचा खेळ
त्याला जीवन हे नाव
राजा घेते ना मी तुझ्या
सांग काळजाचा ठाव

दि.२५/०६/२०२५
रात्री ०१.३० वा.



## (१५)
## ऐसी जगी भ्रमंती

आता कुठून आल्या
वाटा इथे जुळुनी
अनभिज्ञ संगमाच्या
थाटात त्या खुलुनी

प्रत्येक गाव आपुले
देशानुसार झलके
पाहताच प्रत्येकास
ती संस्कृतीही फलके

डोळे किती निराळे
अन रंग कातडीचे
मनी भाव तेच भरले
उदरधर्म आतडीचे

जरी भेटतात लोक
अन खेटतात देश
तरीही आखून सीमा
प्रत्येक मन प्रदेश

घेऊन आठवांच्या
गठडीस आत खोल
ऐसी जगी भ्रमंती
कृती ईश अनमोल

दि.२६/०६/२०२५
सकाळी ११.२० वा.



## (१६)
## स्वच्छंदसे तराणे

इथल्या जगात थोडी
गेले रमून मीही
मज वेगळीच थोडी
वाटे क्षणात मीही

जणू पंख फुटले आणिक
उडते नभात स्वैर
थोडे उधाण व्हावे
नसे त्यात वाटे गैर

मी सोडले मनाला
निश्चिंत मोकळे अन
कानात वारा बोले
जपणे सखे ग हे क्षण

इथल्या जराजराशा
शिकशील चालीरीती
इथल्याही सृष्टीसंगे
लागो जीवास प्रीती

मीही तसाच आहे
सारे तसे पुराणे
आहेत फक्त इथले
स्वच्छंदसे तराणे

दि २७/०६/२०२५
दुपारी ०२.०३ वा.



(१७)

**नाहलेली जलपरी**

रिमझिम रिमझिम पावसा
तू खुळा वेडा असा
ताप देत्या त्या उन्हाचा
तूच होशी रे दिलासा


आज भिजले चिंब ओली
मी अशी गेले सुखावून
आठवांच्या लाटेमध्ये
आपसूक गेले मी वाहून

थेंब अंगावरती झेलून
मी किती रे तृप्तशी
मोद सरिता वाहते मज
नित मनातून गुप्तशी

ओलसर मम कुंतलातून
गंध पवना तू  वहा
राजसा डोळ्यात माझ्या
प्रीतवर्षा तू पहा

बरसू दे मेघातल्या त्या
थंड शीतल जलसरी
आज माझी मीच भासे
नाहलेली जलपरी

दि.३०/०६/२०२५
दुपारी ०४.२६ वा.




## (१८)
## श्रीहरी रे श्रीहरी

कोण छेडी बासुरीचे
सूर पैलाच्या तिरी
धावते मन जपते आणिक
श्रीहरी रे श्रीहरी

श्वास येती आणि जाती
वेणूची ती धुन खरी
आतले ते स्वर निनादुन
बोलते मग वैखरी

सप्त सूर जे गीत गाती
भावनांच्या संगती
मोहनाच्या मीलनाचे
स्वप्न क्षण मनी रंगती

एकदा व्हावे तुझी मी
बासुरी मनमोहना
अधरी धरीशी एकताना
हृदय बोले भावना

मी तुझी आहे तुझी रे
साधिका अन प्रेमिका
जन्म ओलांडून आले
पाहशी मी अनामिका

मीच राधा आणि मीरा
अथवा गोपा गोपिका
रंगी रंगून जात आहे
कृष्ण तू मी संगिका

दि.०५/०७/२०२५
रात्री ११.५४ वा.



## (१९)
## नाथा पंढरीनाथा

घेशी कवटाळुनिया
नाथा पंढरीनाथा
तुझ्या मायेची सावली
लाभो नित माय बापा


कसा कनवाळू देवा
तुझ्या काळजाचा झरा
स्नेह सावली मिळते
जन्म सार्थक बरवा

तुझ्या चरणाशी लीन
सदा चित्त हे असावे
पैलतीरी वैकुंठाचे
ठसे बोलके दिसावे

पंढरीच्या वाटेवर
जीव धावतो ओढीने
श्वास गंधाळती माझे
तुझ्या नामाच्या गोडीने

नाम कधी न सुटावे
जन्मबंधन तुटावे
तुझ्या अंगाखांद्यावर
भक्तीसुखाला लुटावे

दि.०६/०७/२०२५
सकाळी ०७.३७ वा.



## (२०)
## आषाढातील पाऊसधारा

आषाढातील पाऊसधारा
मेघमाळ तोरणे अंबरा
झरझरणाऱ्या सरीसरीतून
एक प्रीतीचा वाहतो झरा

मधेच पडते ऊन चमकते
आणिक मध्ये तेज दमकते
आता वाटते गेला पाऊस
टपटप थेंब नर्तकी ठुमकते

इकडे वर्षा तिकडे उन्हाच्या
खेळ सोंगट्या सारीपाटाच्या
मग डोकावे इंद्रधनू अन
कळ्या फुलाव्या मनरंगाच्या

सांग सांगतो मास मनीचा
दूत हो सख्या मेघा सखीचा
दे संदेशा व्याकुळ गाथा
भाव जाण तू माझ्या मनीचा

अंगावरती येतो शहारा
श्रावणदारीऽऽ आषाढ पहारा
तप्त मनाच्या भूमीवरती
आषाढच हो नित्य उतारा

दि.०७/०७/२०२५
रात्री ११.४७ वा.



## (२१)
## माझा चांदवा तू सदा

चांदण झऱ्याच्या
आज काठावर रमू
एक पूनव मनात
चल तिच्यातून गमू

मन चकोर होताच
भूक चांदण्याची कळे
वाट पाहणे पाहणे
त्यात नाहताना फळे

अशी शीतलता कोठे
कधी कशी सापडावी
भेट आगळी रे तुझी
माझ्याशीच ती घडावी

चांदण्याचा झुला प्रिया
माझ्यासाठी बांध ना रे
माझा चांदवा तू सदा
होशील का सांग ना रे

मग सोशीन कितीही
राती अंधाऱ्या उदास
पुन्हा लाभशील तूच
पुऱ्या चंद्राचा ही आस

दि.१०/०७/२०२५
रात्री १०.४२ वा.

## (२२)
## जगणं म्हणजे काय?

जगणं म्हणजे काय?
रोज उत्साहाला नवे पाय
मरगळ झटकून उगवू आपण
अंधाराचे कसले काय

जगणं म्हणजे काय?
नवा दिवस नवा गाव
रोज नव्यानेच आपुल्या
काळजाचा घेणे ठाव

जगणं म्हणजे काय?
मुखी हासू दडवू घाव
जगण्याच्या मैदानात
जिंकायाचा डाव

जगणं म्हणजे काय?
क्षमा करण्याचे नाव
मनामध्ये जपू सारे
कोमलसे भाव

जगणं म्हणजे काय?
बीज कोंब होत जाय
शिशिराच्या आघातांवर
वसंताचा कोमल पाय

दि.१८/०७/२०२५
रात्री ११.०९ वा.



## (२३)
## तू अशी सुंदरी मनु मंजिरी

तू अशी सुंदरी मनु मंजिरी
रेखीव कलाकृती
ईश्वर सांगू पाहे ऐसी
ललनेची संस्कृती

मनात माझ्या उमलून देशी
मदनरती गोजिरी
मोरपिशी मोहरे भावना
प्रिया अशी साजिरी

तुझ्या केशकुंतली रुळे जो
सुगंधाळला गजरा
खिळून राहती तुझ्यावरी बघ
वेडावून गे नजरा

वसन रेशमी अंगावरती
खुलवीत जा सौंदर्या
उसळून लाटा भरती येई
उधाणलेल्या दर्या

अंगोपांगी बहरून आले
ऋतू सोहळे सारे
तुझ्याच कस्तुरगंधी वेडे
होत वाहती वारे

पहा एकदा मृगनयनी हे
कटाक्ष पडू दे मोहक
जगणे होईल सार्थक माझे
स्वप्न सत्य आरोहक

दि.१९/०७/२०२५
रात्री ०९.०४ वा.



## (२४)
## अधीर मन

अधीर मन सुधीर त्यास
राखून ठेवू कसे
सांग मी निवांत श्वास
राजा घेऊ कसे


कोसळता आठवणींचा
पाऊस रुणुझुणु गाता
मन माझे हे किती बांधू मी
तुझ्याच मागे जाता

उगाच वाटे आला की तू
मला कवेतून भरशील
तसाच माझ्या कुशीत तुही
सदैव जवळी उरशील

धडधड वाढून काळीज होते
वरखाली ते भाते
मन मीलनी रंगून जाते
मदन रतीचे गाणे

नाही आता सांभाळता
येतं मला माझं मन
उडू देते मीही त्याला
नवे नवे देत गगन

दि.३१/०७/२०२५
सायं ०६.४९ वा.




## (२५)
## बांके बिहारी

एक हाक हृदयातून
ऐक मोहना
मी तुझीच प्रियसखी रे
हृदयी पाह ना

मिटलेल्या नयनातून
बिंब तुझे श्याम
आत्मरुप तूच आणि
श्यामा माझे नाम

किती युगे लोटली रे
तूच एक आस
तूच सत्य तूच नित्य
तरीही तूच भास

तूच मोरपीस मनी
फिरते अलवार
राधिकेचा आत्मबाह्य
तूच शृंगार

तूच भाव धाव पाव
कृष्ण मुरारी
सावळ्या तू राजसा रे
बांके बिहारी

दि.०१/०८/२०२५
रात्री ११.११ वा.




## (२६)
## सुरम्य जगणे दिसावे

असे वाटते इथे रमावे
निवांत निळ्या नभतळी
सरोवरातील प्रतिबिंबाचे
चित्र मोहवी जळी

पाचू पसरले मन हे विसरले
इथेच मी त्यावेळी
शोधून घेईन स्मृतींस नेईन
भुलून याही वेळी

आकाशातील शुभ्र पांढऱ्या
ढगात स्वप्न हे वाहे
तरंगून मी हलके हलके
त्या नगरीतच राहे

फुले उमलुनी गाती गाणी
सुरेल स्वर सांगाती
पर्वतरांगा निळसर हिरवट
अनवट वाटा जाती

पुन्हा पुन्हा मी इथेच यावे
जरा बसावे हसावे
पुन्हा पुन्हा मज मनास येथे
सुरम्य जगणे दिसावे
सुरम्य जगणे दिसावे

दि.०४/०८/२०२५
सकाळी ०८.१८ वा.



## (२७)
## पुन्हा एकमेकांस पहावे नव्याने

खुणा सोबतीच्या
मनी या जपाव्या
कळ्या मोगरीच्या
मनी मग खुलाव्या

तुझे माझे हातात
हे हात आले
जणू स्पर्श उमलून
नवे धुंद झाले

तुझे माझे हे
शब्द गुंतून जाता
असे अर्थ जगण्यास
येतील आता

नव्या पावलांनी
नव्या वाटा घ्याव्या
नव्या चांदण्याच्या
ह्या भेटी घडाव्या

जरा चालुनी
जात रहावे नव्याने
पुन्हा एकमेकांस
पहावे नव्याने

दि.०५/०८/२०२५
सकाळी ०९.३१ वा.



## (२८)
## आनंद गंध पाणी

दिसलास स्पष्ट आता
गेले धुके विरून
आले समोर सारे
भेटीतले स्मरून

शीतल मधुर तराणे
आपुले इथेच घडले
प्राजक्त भावनांचे
अलगदसे हाती पडले


समजून घेत गेलो
उमजून रे नव्याने
आता उजळल्या वाटा
अन राती काजव्याने

वाटे नवीन आता
झाले रे तेच नाते
मीही आता नव्याने
त्या वाटेवरती जाते

माझ्या मनात कोकीळ
गातो वसंत गाणी
डोळ्यात पाझरे अन
आनंद गंध पाणी

ठेवा जपून ठेवून
तू ठेव दे मला ती
भेटन मीही तुजला
हवी प्रेयसी तुला जी

दि.०८/०८/२०२५
रात्री ०७.४३ वा.



## (२९)
## किरमिजी किरमिजी प्रकाशवाटा

किरमिजी किरमिजी प्रकाशवाटा
मार्ग काढू या नवा
मिळेल तेथे तेजवारसा
मनास जो जो हवा


एक इवलुशी फट मोकळी
त्यात किरण घुसतो ना
एक इवलुसा प्रकाश देऊन
किती रम्य दिसतो ना

देणे असावे तेजोमय नित
उजळून दाही दिशा
एक नव्याने उजवून द्यावी
रोज वेगळी उषा

अंधाराचे फाडून जाळे
एक प्रभा पसरावी
रात अशी ती कुट्ट काळी मग
नित्य नेमे विसरावी

आत कवडसा जपता जर का
आला प्रत्येकाला
एक दिवस मग नवा नवा रोज
येईल हो उदयाला

दि.०९/०८/२०२५
रातडी १२.३८ वा.



## (३०)
## तू वसंत जीवनी असूनही

अपराध न कळता घडला हा
मी तुला दुखावून गेलो
जीवनात आली तू माझ्या
मी स्वतः सुखावून गेलो

असे कसे मी वागून जातो
मला कळतंच नाही ग
मी ठरवतो तरी कसे
काही नेमके राही ग

तू वसंत जीवनी असूनही
मी शिशिर गळती तुज देतो ना
कारण नसता तुझा दुरावा
ओढवून मी घेतो ना

तू उदास होऊन बसते आणिक
मन माझे ना लागे कुठे
कळले आता तुझ्याविना हे
जीवन निष्फळ रोज  इथे

सोड सखे मज करी क्षमा तू
पुन्हा असे न मी वागेन
जसा सखा तुझ्या मानसीतला
निश्चित तुजला लाभेन

दि.१०/०८/२०२५
रात्री १०.४३ ,वा.



## (३१)
## नवीन वाटे चंद्रमा

नवीन वाटे चंद्रमा
नवी नवीच पौर्णिमा
नव्या ऋतूत सांगते
तुला प्रिया ही उर्णिमा

नवीच रात वाटते
नवी सखी ही भेटते
नवीन ज्वाल मन्मनी
नवीन स्पर्षे पेटते

नवीच जादू फेकते
शीत किरण सुंदरी
नव्या जगात डोलते
नवी दिशा का अंबरी

नवीन पाझरे पहा
अमृताचे चांदणे
दैवी लेणे प्रीतीचे
चांदणीचे सांगणे

नव्याच राज्यडंबरी
स्वप्न देखणे फुले
एक चंद्रमा मनी
रोज प्रियवरा डुले

दि.१२/०८ /२०२५
रात्री १०.४० वा.



## (३२)
## माझ्या मनमंदिराचे धाम

आला आला बाळकृष्ण
सवे गायींची खिल्लारे
शिकवती पक्षिणही
नाद वेणुचे पिल्ला रे

जन्म अष्टमीला होतो
बाळ जगता तारतो
दुःख दैन्य सारे आता
कृपे दूर हा सारतो

राऊळात नाद घंटा
मनमोहन हासतो
कुणा प्रियतम गुरू
कुणा सखा हा भासतो

छेड बासुरीस देवा
तुझ्या सुरात रमू दे
मन चित्त आत्मभाव
सारे भक्तीत गमू दे

तुझे बाळ रूप असो
असो कोणतेही नाम
जन्मोजन्मी तूच माझ्या
मनमंदिराचे धाम

दि.१६/०८/२०२५
सकाळी ०८.४३ वा.

## (३३)
## जिव्हाळा लळा

जिव्हाळा लळा शब्द नाहीत केवळ
ते भावबंधातले कोश प्रेमळ

असे जर कुणाला लळा लागलेला
जिव्हाळा कुणाचा असा लाभलेला

न सुटतो कधीही न फिटतो कधीही
किती देई बळ जन्मजन्मांतरीही

जयांना मिळे लाभे आणि जिव्हाळा
मनी दाटतो एक भावुक उमाळा

खरी काळजाची ती आहे श्रीमंती
टिको काही ना राहो जिव्हाळा युगांती

दि. १७/०८/२०२५
रात्री १२.४३ वा.

## (३४)
## जपणूक

जपणूक करावी मनधाग्यांची
मनापासुनी जपताना
किती प्रेमाचे बंध ओलावे
हळवे अलगद टिपताना

या हृदयाचे त्या हृदयाला
सांगून द्यावे न बोलता
शब्द जिथे थांबती हारती
बहरून येई भावलता

एकतरी मज मिळो जीवनी
रंग मनाचे जपणारा
तारा असावा हृदयाकाशी
आनंदाने दिपणारा

गुजगोष्टींच्या हिंदोळ्यावर
उंच झुलावे मनोमनी
आहे कुणीतरी माझे वाटे
आत भावना क्षणोक्षणी

कुणी शिकवावे कसे जपावे
कोमल भावमनास प्रिया
आतून एका ओढीपोटी
आपसुक घडते जपणे क्रिया

दि.१८/०८/२०२५
सकाळी ०८.२२ वा.



## (३५)
## धरतीचे ओलेपण

धरतीचे ओलेपण
दिले नभाने आंदण
तिचे हरपले मन
दूत झाले मेघागण

धारा बरसती कशा
थेंबथेंबातून आशा
स्पर्श होता देती हर्ष
भिजलेल्या दिशा दिशा

मेघ मल्हार छेडती
सूर नवे कानी येती
टप टप स्वर आता
नवे जन्मगीत गाती

कुस उजवते तिची
आत बीज तरारते
अंकुराचे कोंब आता
उरातून ती भरते

रंग हिरवा उमले
तिचा गर्भ पोसताना
माय माऊली धरित्री
सार्थ गंध हसताना

तीच वसुंधरा नवी
जणू येते जन्माला
ओलेपण बाईपण
आईपण सांगण्याला

दि.२०/०८/२०२५
रात्री ११.५८ वा.



## (३६)
## डोळा पाऊस मावेना

डोळा पाऊस मावेना
आभाळात घुसळण
इंद्रधनू पुसटसे
सप्तरंग मिसळण

डोळा पाऊस मावेना
सरीवर सरी येती
जुन्या आठवांनी मना
गावा अलगद नेती

डोळा पाऊस मावेना
तिथं घर भिजलेलं
एक अंगण आठवे
जिथे बाल्य रुजलेलं

डोळा पाऊस मावेना
मन माझं भांबावलं
एका क्षणी पावसाच्या
मागे मागे का धावलं

डोळा पाऊस मावेना
ऊत भावनांना फार
फिरे काळजात जणु
मोरपीस हळुवार

दि.२१/०८/२०२५
रात्री १२.३७ वा.

## (३७)
## सर वरचढ पडे

जोर पावसाचा वाढे
वीज दमकून चढे
मेघ जोमात जोरात
सर वरचढ पडे
सर वरचढ पडे

झाडे हालती इतकी
वारे लोंबकळती की
झोके घेत राहती ती
कसे पिसाट पळती

आभाळात काळे काळे
खलबत चाललेले
त्याने उनाड ढगांना
बरसण्या पाळलेले

वीज विजाळून जाते
दात विचकून हसे
फासे भीतीचे कशी ती
फेकफेकते की असे

गडगडाटी ढगांच्या
झडतात मग फैरी
जलदांच्या वागण्याने
वाटतात ते हो वैरी

काळजात वीज एक
कळ जोरात चमके
ढग भयानक मनी
दात विक्राळ विचके

आता थांब बाबा थोडा
देई जगण्या उसंत
असे पिसाटल्यावानी
वागल्याने मना खंत

दि २४/०८/२०२५
रात्री १२.४३वा.



## (३८)
## इंद्रधनूच्या रंगांमधुनी

इंद्रधनूच्या रंगांमधुनी
स्वर्ग उतरतो धरणीवर
लोभस सुंदर वर्णसंगती
निसर्ग मोहक करणी तर

सात थरांचा असेल का तो
स्वर्ग म्हणूनी रंगही सात
सप्तसुरांनी देवही असतील
सुरेल ताना गीते गात

तिथे अप्सरा सप्त रंगांची
वसने लेऊनी मुरडत असतील
कला साधनेतुन त्यांच्याही
रंग नाचरे उधळीत असतील

देवस्त्रिया त्या कुलीन देवता
रंग सारे साधनेत भरुनी
भक्तीरंग अनुभवून देतील
रंग त्रिखंडी राहतील उरुनी

रंग मनाचे अंतरंगी मग
लेपून बसतील आणिक हसतील
रंग बाहेरी रंग आतुनी
श्रीरंगाचे अंशच असतील

दि.२५/०८/२०२५
रात्री ११.१७ वा.



## (३९)
## आठवणीतला रम्य सुकाळ

शेतावरची धमाल आता
कुठे विरुनी गेली
गावाकडची कमाल आता
मनी उरुनी गेली

दिवस सुगीचे फुलून यायचे
झुले रानातून झुलून यायचे
माहेरवाशिणी सासुरवाशिणी
हासू पिकुनी नभी जायचे

अंगण गोपाळांनी फुलावे
फुलाफळांनी नित्य फळावे
शेतीमधली धान्यलक्ष्मी
बहरून हे घरदार खुलावे

दानत होती दानासाठी
दाण्यासारखे हसरे मोती
माया वात्सल्याची ख्याती
मनात माणुसकीही होती

गाव हरवला शहर  बकाल
पहाट कसली दुपारी होते सकाळ
कधी अनुभवला ज्यांनी आहे
आठवणीतला रम्य सुकाळ

दि.१३/०९/२०२५
रात्री ११.३० वा.



## (४०)
## गंध अलौकिक पारिजातकी

कुठे उमलला जरी प्राजक्त
आठवण येई प्रीतीची
भार्या प्रेमासाठी जागल्या
एका अनोख्या रीतीची

हट्टा पेटून उठली भामा
गंधफुलांचा बहर हवा
आणा राया माझ्यासाठी
स्वर्गामधला वृक्ष नवा

अंगणी माझ्या केवळ आपण
वृक्ष रोपिला पाहिजे
त्यासव तुम्ही प्रियवरा कृष्णा
भामा गेही राहिजे

मत्सर दाटे सत्यभामेच्या
मनी रुख्मिणी साठीचा
म्हणे या इथे लावा पारिजात
रुख्मिणी घरास पाठीचा

तिथेच हसला गाली प्रभुवर
मनी ठाणीले काहीतरी
फुले तिथे पडतील असा मी
रुजवीन दिव्य तरुवरा परी

हळव्या हळव्या कोमल आपुल्या
प्रियतम रुख्मिणी राणीला
मधुर उपायन देण्यासाठी
काळ योग्य असे जाणीला

जसा लोटला काळ तसा मग
बहरा आला प्राजक्त
सुंदर शोभून शुभ्र कळ्या त्या
देठ केशरी आरक्त

हसला पारिजातक आणि
झुकला अंगणी रुख्मिणीच्या
भामा रडली घडले कसे हे
मनासारखे त्या राणीच्या

कृष्ण सखा मग सांगण्या आला
म्हणे भामा तू ऐक जरा
नको फुकाचा  द्वेष उफाळो
जाळील तुझिया तो अंतरा

जसा मी आहे तसा प्राजक्त
मनःप्रेम जाणतो खरा
मनापासुनी प्रेम रुख्मिणी
करते या श्रीरंगवरा

तुझीही प्रीती माझ्यावरती
लक्ष परी सवती वरती
म्हणून मत्सर येतो हृदयी
भाव द्वेषाचे ये भरती

ती तर केवळ अनन्यभावें
मुरलीधरा मज नित पुजते
मनोमनी वरलेले मजला
सदासर्वदा ती भजते

सोड आता तू द्वेषभावना
शुद्ध होऊ दे चित्त पावना
मिळेल तेंव्हा पारिजातक
आणि पावशील तूही मोहना

गंध अलौकिक पारिजातकी
छंद आगळा जडो तुला
परिमळलेली गोड भामाही
सत्वर मुग्धा लाभो मला

दि.१५/०९/२०२५
रात्री ०९ ४३ वा.



## (४१)
## श्रीमुख सावळे सुंदर कृष्णा

तुझाच लागो ध्यास मनाला
नजर तुझी मजवरी राहू दे
श्रीमुख सावळे सुंदर कृष्णा
सदा सर्वदा मला पाहू दे

तुझ्या कृपेची नजर मजवरी
छत्र बनून रे शिरी असू दे
तुझ्याच या विश्वात ईश्वरा
मका चरणी तुज नित्य वसू दे

येतील जातील जन पळ पळ हे
एक तूच खरा साथी असावा
येणे जाणे निश्चित असता
भक्तीदीप मज हाती असावा

रूप तुझे ते मोहक सुंदर
काय हवे पोळल्या मनाला
एक दिलासा तूच तू देवा
जगताना मग क्षणाक्षणाला

सालंकृत तव रूप मनोहर
मानसपुष्पा वाहीन तुजला
बाहेरी तू राऊळातही
मनमंदिरीही पाहीन तुजला

दि.१९/०९/२०२५
दि ०७.०६ वा.



## (४२)
## ती पूर्णाकृती होईल ना

कलाकुसरीच्या सीमा साऱ्या
इथे दाटल्या मुक्तपणे
फुले डोलली त्यावर आली
फुलपाखरे उन्मुक्तपणे

रंग उमलले गंध लेऊनी
केशकुंतली माळीयले
अंबाड्यातील सुमनसख्यांनी
देठ माहेरी गाळीयले

झगाच विणला फुग्यासारखा
आयुष्याला गुंफीयले
रीत शोधली आनंदाची
मन धाग्यातून मांडीयले

उभ्या आडव्या सुखदुःखांच्या
जीवनरेषा शिवताना
वीण न उसवो म्हणून अट्टहास
आत्मबंध कळो निवताना

निव्वळ आकृती एक कलाकृती
ती पूर्णाकृती होईल ना
माझे मीपण ईश निरूपण
मर्माहुती दिवी जाईल ना

दि.२५/०९/२०२५
रात्री ०९.२३ वा




## (४३)
## तुला वाहते कुसुमी वेणी

तुला वाहते कुसुमी वेणी
जिच्यात दडली गंधित गाणी
त्यावर नाझ्या आत्मरूपाचे
भाव प्रफुल्लित अत्तर पाणी


जगदंबे तू स्वीकारावी
भावफुलांची रंगीत वेणी
भक्ती उमलून येते आणिक
गुज मनीचे सांगेल कोणी

धागा एक तो धरून ठेवील
तुला मला त्या फुलांभोवती
जिवाशिवाचा धागा अखंडित
जन्मोजन्मी नियती ओवील

त्या वेणीतील परिमळ माझ्या
अंतरातला सुगंध देईल
फुलांसवे मन तुझ्या संगती
कुशीत बसण्या दौडत येईल

पुष्प जीवाचे कलिका आधी
मग ते उमलून जगता येईल
वृद्धपणातील सुकणे तरीही
तुला वाहता सार्थक होईल

दि.२६/०९/२०२५
रात्री ११.३१ वा.



## (४४)
## विरंगुळा

विरंगुळा कशाला तो
म्हणावा हे दिसते
मन हिरवाईच्या रंगी
रंगुनिया बसते

दूर तिथे डोंगरावर
त्याला पाठवावे
उंचावरूनिया भुईस
खोल आत साठवावे

तरुवर तिथे खग
झाले मन माझे
किलबिल आनंदाचा
स्वर कसा जागे

सरोवरी आता त्याने
जळ होत जावे
लाटांवरी आनंदाचे
तरंग गात जावे

गवताच्या पात्या
लुसलूस काळजाच्या
काळजात पात्या
लवलव भावनेच्या

घरकुल तिथे कुणी
मांडले रानात
सृष्टी सारी बोलते ना
गुज हो कानात

दि.२८/०९/२०२५
रात्री १२.३८ वा.

## (४५)
## वेचूया सोने आनंदाचे

वेचूया सोने आनंदाचे
ते पदरी पडलेले वा दडलेले
कधी मिळतील झरे खळखळते
कधी ते प्रवाह अडलेले

पहावे निसर्गात तो डोले
कधीतरी कोकीळ स्वरात बोले
आनंदाचे काय सांगावे
काळजातील मधुगरे  ओले

पहावा इतरांच्या आनंदी
कुणीतरी मिळवतो होऊन छंदी
खग होऊन उडता यावे
कल्पनेतील नभी स्वच्छंदी

कधी मग गर्दीत सापडे वेडा
कधी मोदाचा मुखात पेढा
कधी तरी गढून दडून जातो
कधी दुःखाचा त्याला वेढा

कधी खणून काढणे त्याला
कधी फुलांसवे वेचावे
कधी आत असता जाणावे
कधी दूर तरी खेचावे

दि.०१/१०/२०२५
रात्री ०९.४८ वा.



## (४६)
## चांद उतू किती गेला

चांद उतू किती गेला
त्याचं सांडलं चांदणं
लेऊ तनामनावर
कोजागिरीचं गोंदण

एका संवत्सरामध्ये
येई एकदा भरास
साऱ्या नभोमंडळात
चंद्रदेवाची आरास

अमृताचा सडा पडे
अनमोल गुणधर्म
जाणीयले वैद्यराजे
सोमदेवतेचे मर्म

दुग्धप्रसादात येई
पाझरून पीयूष हे
प्रासादाच्या सौधावर
चंद्र वाटे आयूष हे

नका दवडू उगाच
वाया रात लक्ष्मीची
जागरणे मिळते की
कृपा जन्मोजन्मीची

दि.०६/१०/२०२५
रात्री ११.५१ वा.

## (४७)
## जीव ज्योतीने उजळत जावे

कोण म्हणतं आयुष्याला
रोज मिळते किनार ?
वाहत जाता जाता कळते
सारेच आहे असार


न जावे पुढे पुढे मग
गत्यंतर का नाही ?
कर्म कोणते धर्म कोणते
काय असे मागे राही ?

गुंतून जाते तनमन स्पंदन
कधी भेटते गंधित चंदन
कधी अनाहुत कोणे बंधन
कधी तेवते सांज निरंजन

कधी कोरडी ठक्क पापणी
कधी गाळते आसव पाणी
कधी जगण्याची परवड सगळी
कधी दुःखाची होत कहाणी

जाणे ठरले जात रहावे
गाणे आपुले गात रहावे
कुठे संपणे ठाऊक नसता
जीव ज्योतीने उजळत जावे !

दि.१०/१०/२०२५
सायं ०७.२९ वा.



## (४८)
## सरी प्रीतीच्या साजना

पावसात ये निरोपा
जरा घेऊन रे मेघा
वाट सजनाची पाहे
जोड मीलनाच्या रेघा

थेंब थेंब सळसळे
मनी मदन उसळे
जलधारांनी वणवा
आत केवढा तो जळे

कसे कुणाला कळावे
विरहात झुरणे हे
उगाळून जीव वेडा
आसरूपी उरणे हे

येतं आभाळ भरून
तुला कितीदा स्मरून
आत पूर दाटतो नि
शांत राहते वरून

बरसू दे आता तुझ्या
सरी प्रीतीच्या साजना
दे ना दिलासा विरही
अधीरशा माझ्या मना

दि.१४/१०/२०२५
रात्री ११.४७ वा.



## (४९)
## हिमाचली सार्थकत्व

देवभूमी हिमालयी
निसर्गाची उधळण
रंग खेळतात होळी
देखणीशी मिसळण

उन्हं चुंबतात शृंग
नगराजाचे वाकून
हिम वाढवी सौंदर्य
खडकास की झाकून

देवस्त्रियांची दर्पणे
हिमालयी अंगोपांगी
भूवरीची कीर्ती देव
लोकी शिखरांनी सांगी

झाडे सुरुची वाढती
मनी  ईर्षा भरूनी
कातरली पाने कशी
गेली आकाश तरुनी

एक आगळी शांतता
सत्त्व तपाचरणांचे
हिमाचली सार्थकत्व
आराधना साधनांचे

दि.१५/१०/२०२५
रात्री ११.०३ वा.



## (५०)
## तू आला की माझी दिवाळी

एक दिवा मी आज लावला
तुझिया आठवणींचा
तेजामागे घडला आपसुक
सोहळा पाठवणीचा

त्या त्या आपुल्या गोड स्मृतींचे
तेज दीप उजळले
किती दिव्यांची आरासही मज
मनी मला ते कळले

कळेल का रे उंबऱ्यात मी
सदाची तेवत आहे
तुझ्या वाटेवर पंचप्राणांची
पणती ठेवत राहे

आठवते का बघ ना तुजला
ती पहिली दिपवाळी
घरात होती मनात आपुल्या
उजळून गेली दिवाळी

ये ये झडकरी तुझ्या पदतळी
जीव दीप लावीयले
तू आला की माझी दिवाळी
दिव्यांस मी दावीयले

दि.१८/१०/२०२५
रात्री ०९.३७ वा.




## (५१)
## एक दिवाळी मनात चाले

तो दरवळ बघ आसमंती रे
भरून गेला आहे
सुगंध उटणे तैल परिमळे
दीप लावला आहे

स्पर्श सुखाचे अन मायेचे
अंगावरूनी फिरताना
काळ आठवे बालपणीचा
आनंदची जणु भरताना

रांगोळीतील रंग बोलके
आजही मला खुणावती
सडे शिंपिले जे आईने
सुवास मोदे दुणावती

फराळ सारा घमघमाट तो
आजही मला भुलवीतसे
आरासांचा चमचमाट मग
घरादाराला खुलवीतसे

एक दिवाळी मनात चाले
नित्य नव्याने उजळणारी
प्रकाश देते सुखा वितरते
क्षण तेजाळे फळणारी

दि.२०/१०/२०२५
रात्री ११.२३ वा.




**(५२)**

**जळते अजूनी पणती**

आले पाहुणे गेले पाहुणे
आली दिवाळी गेली
वर्षभराच्या प्रतीक्षेतली
ठेव हृदयी ठेवली

कुणी ठरवले होते काही
ते ते सार्थक झाले
सुखा सुखांचे चिमणे दीपक
घरोघरी हो आले

शरद ऋतूची शीतल हलकी
चादर अंगावरती
अंधारातली तेज आरती
प्रकाशास ये भरती

नव्या नव्याने वस्त्र नेसले
नवीन आभूषण हे
घरादाराला वाटे दिवाळी
आनंदे भूषण हे

खुणा तियेच्या मनात अजूनी
जळते अजूनी पणती
एक दिवाळी सदा तेवते
मनात खरी मिणमिणती

दि.२६/१०/२०२५
रात्री ०९.२७ वा.

## (५३)
## चला सावरू दिवाळी

चला आवरू दिवे दीपक ते
चला सावरू दिवाळी
पुन्हा सजविण्या पुढच्या वर्षी
दमदमती दिपवाळी

घड्या करू या नव वसनांच्या
वास तयांचे नवीन
दाग दागिने पेट्यांमध्ये
पुन्हा बसतील प्रवीण

सुगंध उटणे तबकी उरले
तैल अजून घमघमले
खुणा उजळ ठेवुनी मनातून
दीपही आता शमले

फराळ उरला डबे तळाशी
संपवताना हुरहूर
कढईमधल्या तेलात हो हे
कसले उठले काहूर

गेली दिवाळी तरीही मनातून
एक प्रकाश उरावा
दिवा काळजातल्या पणतीचा
तेज देण्या पुरावा

दि.२७/१०/२०२५
सकाळी ०८.३९ वा.

## (५४)
## तू दिलेले क्षण हे जीवन

आता कुठे जावे कशाला
चरणरज  तुज लागली
देहघर माझे तुझ्या रे
पावलांची सावली

तू दिलेले क्षण हे जीवन
मी जगावे भक्तीने
तूच दिधल्या अन अपारशा
अंतरातील शक्तीने

विश्‍व हे रचना तुझी
जीव जीवही तव कृती
तूच कर्ता करविता परी
भूल पडते विस्मृती

चित्त माझे लग्न राहो
त्या तुझ्या तत्त्वातुनी
ओळखावे तू खरे
आवाजशी मज आतुनी

एक तू अन एक मी
वेगळे नाही कुणी
गाठ जन्मोजन्मीची
देतोस देवा सांधुनी

दि.३०/१०/२०२५
सकाळी ०७.४३ वा.

## (५५)
## कष्टभंजक हनुमते

कष्टभंजक हनुमते
तव नाव हृदयी रेखिले
ज्याने श्रीरामाला सदा
निज काळजातून देखिले

संकटे तू दूर करीशी
दुःख पीडा हारका
तूच बाधा संपवूनी
मानावांसी तारका

दास तू रामास लाभे
देव धन्य ते जाहले
ऐहिकांचे भार तुजवर
आश्वस्त होऊन वाहिले

वाहिल्या चिंता समग्र
तूच आपद नाशका
रामनामाचे चिरंतन
दिव्य औषध भाषका

घे प्रणामा वंदना
अभिवंदना वायुनंदना
जाणीशी देवा तू आमुच्या
अखिल व्यथा आक्रंदना

दि.०१/११/२०२५
सकाळी ०९.३१ वा.

## (५६)
## झणी पुन्हा गेलास की

मज मनीच्या भावना
सांग कळल्या का खुणा
बोलले तरीही न कळते
का असा करीशी गुन्हा

बोलती ना शब्द केवळ
लोचनेही वाच ना
मी तुला स्मरते तरीही
तनुवरी रोमांच ना

तू जरा पाहशील माझे
वागणे समजे तुला
जाण थोडे हळवे कोमल
जाण मानस मन फुला

आज मी रे उंबऱ्यातच
तेवले बघ सांजेला
पांघरूण बसले कधीची
तू दिलेला जो शेला

तू तिथे त्या वळणावरती
भासला आलास की
चिंतनातच होते आणि
झणी पुन्हा गेलास की

दि २८/१०/२०२५
सकाळी ०९.५७ वा.

## (५७)
## धमण्यांमधले रक्त सांगते

धमण्यांमधले रक्त सांगते
काय मनातील चिंतन आहे
रोज कोणत्या विचारातले
सखोल चालत सिंचन आहे

सातत्याने विचार ज्याचा
भिनले जाते रुधिरामधुनी
कधी उमटते तेच खरे जे
सहजासहजी अधरामधुनी

पिढ्या पिढ्यांना देत वारसा
वाहत जाणे धर्म तयाचा
हृदयामधुनी शुद्ध होऊनी
पुन्हा जन्मणे भाव जयाचा

अखंड चाले यज्ञ देही या
आहारातून धातू सात
होत निर्मिती राखण करती
देती जीवाला अतुल्य साथ

रक्ताचे मग नाते होते
बांधून ठेवी सर्वांना
रक्त नव्या जन्माचे कारण
रक्त पोसते सर्वांना

सार जीवाचे रक्तच असते
रक्त अपार हे चैतन्य
कधी गोठते कधी भळभळते
प्रकृती कशी परीक्षा अनन्य

कुणा कधी वाचविण्या द्यावे
दान तयाचे महान हो
ही देवाची लीला मोठी
रक्त गुणांची खाण हो

दि.०४/११/२०२५
रात्री ११.३१ वा.

## (५८)
## तुझ्याचसाठी भावफुलांचा

तुझ्याचसाठी भावफुलांचा
हा गजरा मी माळीयला
तुला दिलेला शब्द सख्या मी
सदैव प्रेमे पाळीयला

गंध फुलांचे गंध मनाचे
हुंगून घेता कळे तुला
एक सारखा तुझ्या प्रीतीचा
झुलते मी रे प्रिया झुला

आभूषणे जी अंगावरती
खुणा तुझ्या अनुरागाच्या
स्मृती किती अगणितशा माझ्या
तुझ्यावरील रतीरागाच्या

थांब जरासा घे निरखून मज
पापणीतल्या गावात
तुझेच येते नाव प्रियवरा
संगे माझ्या नावात

इथे राहतील निश्चित आपुल्या
खाणाखुणा हळुवार प्रिया
जपणे ठेवू परस्परांच्या
मनास आपुली हीच क्रिया

दि.०५/११/२०२५
रात्री ११.३७ वा.

## (५९)
## धुक्यातल्या धुंदीमध्ये

धुक्यातल्या धुंदीमध्ये
मन विसरले
मनात आगळे एक
धुके पसरले

तिथे काही ओळी माझ्या
कवितेच्या गेल्या
धुक्यात त्या न्हाऊनिया
धुकाळल्या झाल्या

हिव शिरशिरी मग
अर्थाला आली
रोमांचित कविता ही
शोभूनिया गेली

भाव गेले भाव खाऊन
दव चकाकले
हातावर आज माझ्या
आभाळ वाकले

आल्या थोड्या सरी कशा
सरसावलेल्या
धुक्यामध्ये शोधल्या मी
माझ्याच सावल्या

दि.०६/११/२०२५
पहाटे ०५.३७ वा.

## (६०)
## शब्द आले शब्द गेले

अर्थास जागवुनी
शब्द हे पसार झाले
देऊनी सार सारे
स्वतः नि:सार झाले

आणले तयांनी भाव
होते न त्यांचे मूल्य
शब्दात सांगणे ना
रत्ने अशी अमूल्य

रस भरुनी आणलेले
अंगा अंगावरी शहारे
मोद पावसात जसे
मयूरांचे ते पिसारे

लेऊनी अलंकार ते
मटकले चहुकडे
कधी गाथा झाले तर कधी
तुटत्या मनाचे तुकडे

शब्द आले शब्द गेले
छाप आजही मनात
जन्म युगे सारी येथे
सामावलेले क्षणात

दि.१०/११/२०२५
रात्री १२.४७ वा.



## (६१)
## तूचि मानसीची मनु

साज सजलेली तनु
तूचि मानसीची मनु
मोहवितो सखे मला
तुझा प्रीतकण क्षणक्षणू

चुडा खुणावत राही
खणखण गाता गाता
पैंजनांची रुणझुण
तुझ्या संगती चालता

हार गळ्यात विजेते
मी हरलेलो कसा
तुला पाहून मोहिनी
मी हरखलो कसा

तुझ्या अंगठीत राहिले
माझे हृदय वाहिले
तुझ्या नथीच्या मोत्यांत
स्वप्न नशिले पाहिले

भाळी कोरुली चंद्राची
शची शोभशी इंद्राची
तूच स्वामिनी प्रियतमे
मज रंध्र रंध्राची

दि.१४/११/२०२५
सकाळी ०६.३९ वा.

## (६२)
## देत जाताना आलोक

केव्हातरी मनात
येतात काही लोक
विसरले जे कधी
देत जाताना आलोक

आले संगती चालले
चार पावले सुखाने
कधी सोडविले त्यांनी
माझ्या दुःखाचे उखाणे

गेली गाडी जी निघून
होते तिथले प्रवासी
कोण राहते कुठेही
कायमचे हो निवासी

बाजारात गर्दीतही
काही आपुलेसे चेहरे
कधी झळकती जणू
स्मृतीतले ते मोहरे

कधी काळ पटलाच्या मागे
गेले असूनी दडले
त्यांच्या सोबतीचे पुन्हा
मनी चांदणे पडले

दि.१६/११/२०२५
सकाळी ०७.०६ वा.

## (६३)
## अवचित की भेटला

कुणी अचानक कसा कधी हा
अवचित की भेटला
काळ आपोआप वेगे
मन मनाने रेटला


त्याच्या माझ्या जीवनात
गेले पाणी ते वाहून
तरी कोणते हे देणे
गेले द्यायचे राहून

एक हासू ओठावर
आसू आत कोंडलेले
दैवासंगे दोन जीव
व्याकुळतीने हो भांडलेले

तरी गेल्या वाटा
आपापल्या वाटेने का
आता नकळत ओढ
पुन्हा असे भेटणे का

काय बोलावे सुचेना
शब्द निसवून गेला
वीण परकीशी जी ती
सखा उसवून गेला

दि.१८/११/२०२५
सकाळी ०७.१९ वा.



## (६४)
## हृदयाच्या पानावर पाखरू

हृदयाच्या पानावरही
असेच आशेचे पाखरू
किती उडू कुठे उडू
की कवेत नभालाच करू

किती थांबवावे मी त्याला
पंख जे त्या लाभले
बळ त्यातले कसे मोजावे
मन उडाया लागले

इवले डोळे जरी मनाचे
नजर विश्वाची सामावे
इवली चोच जणू मनाची
क्षण अनमोल टिपावे

कधी भिजते हे पाखरू....
आपल्याच उदास पावसात
आपणच झटकावे पंख आणि
पुन्हा उडण्या जोमात

या पाखराचे घरटे कुठे असेल
कसे असेल विचारूच नका
अगणित घरे असूनही
ठावठिकाण्याचा कशास हेका

दि.१८/०३/२०२५
सकाळी ०७.४९ वा.

# लेखिकेचा परिचय

- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४

**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्‌भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा:** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्‌भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

  त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी

अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), मृद्गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा, सृष्टीगंध, युगंधरा, सुख सुखाचं, पानापानातली कथा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश, निरव नमन (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप, श्रीरंग (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री, सहा सोहळे (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), बकुळफुले, अळुमाळु, सुरभी, कामिनी, फुललेलं मौन (फुलांवरील कविता), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता, शब्द तुझ्या नावाचे (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी, मृणालिनी, उडण्या हे आभाळ (स्त्रीजीवन), प्रमिला (धरती-आकाश), लाघव वेळा (सकाळ-संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, क्षणांचं देण, आयुष्याचं गाव (जीवनपर कविता), प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, दरवळ तुझे नि माझे (त्याच्यावरील प्रीत कविता), मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी (ललितलेख), बोल बरवे, मनस्विनी, हृदयस्पर्शी (रसिक प्रतिक्रिया - कवीश्वर), प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (अन्य रसिक प्रतिक्रिया), गंधराणी (मिश्र कविता), श्रावणी (पाऊस कविता), उल्का (गझल), तेंव्हा (वेळा), नभ मोजताना (धरती-आकाश), जरा रेंगाळले (वाट), रंगतनु, कृष्णकांत (रंग), कविता माझी, लोभसवाणी (सर्वोत्कृष्ट कविता), कवडसा, मृण्मयी, अबोली, अनावर मना, मल्मली, अक्षरा, अनुरंग, नवी नवेली, मन ओथंबुन गेले, उमलवाट, (मिश्र कविता) मन मनुल्या, शब्द पाखरं, वेध मनाचा, मन मोहरून माझे (मन), सुखाचा किनारा (सुख-दुःख), आनंद गंधपाणी, दूर त्या तिथे (गंध-सुगंध) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके –**

(पशु–पक्षी – घरटे) स्पंदनरेषा, (नाती–गोती) – थांब जरा तू, (चंद्र आणि लज्जा या भावनांवरील कविता) – घडते नवेच काही. (संस्कृत बाल काव्यसंग्रह) – बालमोदिनी, सुधा मूर्ती यांच्या 'तीन हजार टाके' या मराठी पुस्तकाचा संस्कृत अनुवाद – त्रिसहस्रसीवनम्, (संस्कृत अनुवाद) – मनुष्यः.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१

- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८
- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री मुलाखत, दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/mah<br>a_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/mah<br>a_governor/status/143955<br>9859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश<br>आमटे यांच्या आत्मचरित्राचा<br>संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com<br>//lokrang/sahitya-<br>akademi-award-for-<br>translation-autobiography-<br>of-prakash-<br>amte-poet-prof-dr-<br>manjusha-kulkarni-<br>prakashwata-zws-<br>70-2612674/lite/<br>?utm_source=whatsapp_<br>web&utm_medium=social&<br>utm_campaign=socials<br>harebuttons |
| ७ | https://mr.wikipedi<br>a.org | https://mr.wikipedia.org/<br>wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांचा महाराष्ट्र राज्याच्या<br>मा. राज्यपालांच्या हस्ते<br>अभिनव साहित्यिक विक्रम<br>केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/<br>6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/<br>7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com<br>MahaGovtMic/status<br>1476551366352924<br>672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/<br>InfoVidarbha/status/<br>1418559733921816<br>580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>सखी सह्याद्री - डीडी<br>सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/<br>VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT<br>LxInwuJc ; https:/<br>youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह<br>डॉ.मंजूषा कुलकर्णी /<br>नवरात्री स्पेशल /<br>सकाळ मीडिया | https://youtu.be/<br>m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=1266533350529198id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम - ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम - ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग - १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग -२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : १२६
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ०६
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •